आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ जुलै २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा गडकिल्ल्यांना जागतिक वारसा म्हणून युनेस्कोची मान्यता मिळाल्याबद्दल आज विधानसभेत आनंदोत्सव

- अंमली पदार्थांच्या विक्रीत वारंवार अटक होऊनही जामिनावर सुटणाऱ्या आरोपींना मोक्का लावण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याच्या दरात घसरण

- भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आज अंतराळ स्थानकातून परतीच्या प्रवासाला निघणार

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला विजयासाठी १३५ धावांची गरज

**<><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गड किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान मिळाल्याबद्दल आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन दिलं. ही दुर्गसंपदा राज्याचा वारसा असून, जागतिक पातळीवर हा मान मिळणं ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. लोककल्याणसाठी तसंच स्वराज्य रक्षणासाठी या किल्ल्यांचं बांधकाम करण्यात आलं असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेवरचे विचार, कालातीत असल्याचं मत युनेस्कोच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. राज्यातल्या या किल्ल्यांचा, वारसा यादीत समावेश झाल्याबद्दल त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री, परराष्ट्र मंत्री, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्यासह राज्यातल्या इतर अधिकाऱ्यांचे आभार मानले. युनेस्कोने दिलेलं हे नामांकन टिकवणं मोठं आव्हान असून, या किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी नागरीकांनी हातभार लावावा असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

CSMT स्थानकाच्या परिसरात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारावा आणि मुंबई सेंट्रल स्थानकाला नाना शंकरशेट यांचं नाव देण्याची मागणी भास्कर जाधव यांनी केली. CSMT पुनर्विकासात शिवाजी महाराज यांचा पुतळा लावण्यासाठी जागा निश्चित आहे. तसंच मुंबई सेंट्रल स्थानकाला नाना शंकरशेट यांचं नाव देण्याचा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी रेल्वे मंत्रालयाला पाठवला आहे. त्यावर लवकर निर्णय घ्यावा यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

विधानभवनाच्या परिसरातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करुन, आज आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातले इतर मंत्री आणि आमदार यावेळी उपस्थित होते.

कुठल्याही अनधिकृत बांधकामांना सरकार पाठीशी घालणार नाही आणि त्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करू असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिलं. मुंबईतल्या अनधिकृत बांधकामांची यादी आणि त्यांचे वर्गीकरण करण्याचे आदेश त्यांनी मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना दिले.

राज्यातल्या धरणांमधला गाळ काढण्यासंदर्भात नेमलेल्या समितीचा अहवाल आपल्याकडे सादर झाला असून, त्यातल्या शिफारशींना आपण मान्यता दिली आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितलं. मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरीनंतर गाळ काढला जाईल असं ते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात म्हणाले.

संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले. विजय वडेट्टीवार यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.

**<><><><>**

राज्यात अमली पदार्थांच्या विक्रीत वारंवार अटक करण्यात येऊनही जामीनावर सुटणाऱ्या आरोपींना मोक्का लावण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्यात येणार आहे आणि कायदेशीर अज्ञान असणाऱ्या आरोपींचे वय कमी करण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली. याबाबतच्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते.

अमली पदार्थांच्या धंद्यात अल्पवयीन मुलांना सामील करुन घेण्यात येते आणि त्यांच्यामार्फत हे पदार्थ विक्री करून कायद्यातून पळवाट काढण्याचा प्रयत्न करण्यात येतो. त्यामुळे कायद्याच्या व्याख्येत बदल करून सोळा वर्षांच्या आरोपींना अटक करण्याची तरतूद करण्यात येईल आणि वारंवार असे गुन्हे करणाऱ्यांना मोक्का लावण्यासाठी कायद्यात बदल करण्यात येईल असं ते म्हणाले.

परदेशी नागरिक, विशेषतः नायजेरियन व्यक्ती या गुन्ह्यात सापडतात त्यांना त्यांच्या देशात परत पाठवण्याची तरतूद आहे मात्र त्यातून वाचण्यासाठी ते अन्य छोटे गुन्हे करून इथेच राहतात, केंद्र सरकारला हे लक्षात आणून दिल्यावर त्यांचे हे छोटे गुन्हे माफ करून त्या नागरिकांना त्यांच्या देशात परत पाठवण्यात येईल असंही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

राज्यात शून्य ते शंभर युनिट इतक्या वीज ग्राहकांसाठी त्यांच्या घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याची योजना राबविण्यात येणार आहे, त्यासाठी अनुदान देखील देण्यात येईल आणि त्यामुळे अशा घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळेल, या योजनेला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. याबाबतच्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते.

राज्यातील कांदळवने नष्ट करून इमारती बांधणाऱ्या विकासकांच्या कामांना स्थगिती देण्यात येईल आणि त्यांच्या परवानग्या तपासण्यात येतील अशी ग्वाही वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना भास्कर जाधव यांनी उपस्थित केली होती, त्यावर संजय केळकर यांनी उपप्रश्न विचारले.

ठाण्यातील रुस्तमजी आर्बेनिया इथं कांदळवन नष्ट करून इमारती उभारल्याच्या तक्रारीनंतर महाराष्ट्र सागरी किनारा नियंत्रण प्राधिकरणाला २०२३ साली तपासणी करुन अहवाल सादर करण्यास केंद्राकडून कळवलं होतं मात्र त्यांनी दोन वर्षे त्यावर काहीच कारवाई केली नाही, यासाठी जबाबदार अधिकारी , पालिका अधिकारी यांची उच्च स्तरीय चौकशी तीन महिन्यात करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही देखील मंत्री नाईक यांनी दिली. याशिवाय असं बांधकाम करणाऱ्या विकासकाला कठोर दंड ठोठावण्यात येईल, असं ही मंत्री म्हणाले.

**<><><><>**

शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. ऑगस्ट महिन्यात अंतिम सुनावणीला सुरुवात करू, असं सांगत न्यायालयानं आज सुनावणी पुढं ढकलली. आज, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या. या प्रकरणाला दोन वर्षे झाली आहेत त्यामुळे आता नव्यानं अर्ज करणं बंद करावं, असं त्यांनी ठाकरे गटाला सांगितलं.

**<><><><>**

गेल्या महिन्यात घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर उणे १३ शतांश टक्क्यांपर्यंत घसरला आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार खाद्यपदार्थ, खनिज तेल, मूलभूत धातूंचे उत्पादन, कच्चं तेल आणि नैसर्गिक वायूच्या किमतीत घट झाल्यामुळे ही घसरण झाली आहे.

**<><><><>**

भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि ऑक्सिओम-4 मोहिमेतले त्यांचे तीन सहकारी आज **अंतराळ** स्थानकातून परतीच्या प्रवासाला निघतील. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी साडेचार वाजता यानाच्या अनडॉकिंगचं नियोजन करण्यात आलं असून, उद्या दुपारी तीन वाजता हे अंतराळवीर पृथ्वीवर परत येतील अशी माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी दिली आहे. त्यानंतर पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी शुक्ला इतर सहकाऱ्यांसह फ्लाईट सर्जनच्या देखरेखीखाली सात दिवसांच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये सहभागी होतील. या मोहिमेअंतर्गत १४ दिवस शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात मुक्काम केला त्यामध्ये भारतासाठी सात प्रयोग केले.

**<><><><>**

भारताच्या ऐतिहासिक चांद्रयान ३ मोहिमेला आज दोन वर्षे पूर्ण झाली. या मोहिमेचा उद्देश चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ लँडर आणि रोव्हर उतरवणं तसंच संपूर्ण लँडिंग आणि रोव्हर प्रकियेचं प्रात्यक्षिक दाखवणं हा होता.

**<><><><>**

देशाचे माजी गृहमंत्री, राज्याचे माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. नांदेडमध्ये धनेगाव इथल्या शंकरराव चव्हाण यांच्या समाधीस्थळावर माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण, माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, आमदार श्रीजया चव्हाण यांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं.

<><><><>

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला विजयासाठी १३५ धावांची गरज आहे. लॉर्ड्स मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात इंग्लडचा दुसरा डाव १९२ धावांवर संपला. दिवस अखेर भारताच्या दुसऱ्या डावात ४ बाद ५८ धावा झाल्या होत्या. रात्रीचा रखवालदार म्हणून आलेल्या आकाशदीपला इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स ने दिवसातल्या शेवटच्या चेंडूवर तंबूत परत पाठवलं. पहिल्या डावात शतक झळकावणारा के एल राहुल ३३ धावांवर खेळत आहे. आज सामन्याचा अखेरचा दिवस आहे. मालिकेत दोन्ही संघांनी आतापर्यंत प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

<><><><>

दाक्षिणात्य चित्रपट अभिनेत्री बी सरोजा यांचं आज बंगळुरुमध्ये निधन झालं. त्या ८७ वर्षांच्या होत्या. अभिनय सरस्वती म्हणून प्रसिद्ध असलेल्या सरोजा यांनी १९५५ मध्ये महाकवी कालिदास चित्रपटाद्वारे रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. सात दशकांहून अधिक काळ त्यांनी कन्नड, तमिळ, तेलगू आणि हिंदी भाषेतल्या २०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं.

<><><><>

राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव सुनिल बंडगर यांचं आज पहाटे सोलापूरमधे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. ते ५० वर्षांचे हेते.

//<><><><>//